दिनांक ३१ ऑक्टोबर २०२१ रोजी सार्वजनिक आरोग्य विभागाची गट ड पदांसाठी परिक्षा घेण्यात येत आहे.या परिक्षेच्या अनुषंगाने काही व्हिडीयो समाज माध्यमांमध्ये पसरविण्यात येत आहेत. सदर व्हिडीयो मध्ये परिक्षेचे हजेरी पत्रक (ATTENDENCE SHEET) दिसत असून त्यावरुन विभागाचा गट ड संवर्गातील परिक्षेच्या पेपरफुटी ची अफवा पसरविण्यात येत आहे. या संदर्भात असे स्पष्टीकरण देण्यात येते की, हजेरी पत्रक (ATTENDENCE SHEET) हे गोपनिय दस्तावेज नसुन ते नियमित स्टेशनरी सोबत पाठविण्यात येते किंवा स्थानिक पातळीवर छापून घेण्यात येते. त्यामुळे हा पेपरफुटीचा प्रकार नसुन परिक्षेसंदर्भात लागणा-या नियमित कागदपत्रांचा भाग आहे. तरी सार्वजनिक आरोग्य विभागाव्दारे सर्व उमेदवारांना आवाहन करण्यात येते की परिक्षेसंदर्भातील कोणत्याही अफवेवर विश्वास ठेवू नये.